**आर बी आय / २००६-०७/२३१**
डी एन बी एस (पी डी) सी. सी. सं. ६०/०२.०१/ २००५-०६

डिसेंबर ९, २००५

प्रति,
सर्व गैर बँकींग वित्तीय कंपन्या (एन बी एफ सीज)
प्रकीर्ण गैरबँकींग कंपन्या (एम एन बी सीज)
अवशिष्ट गैरबँकींग कंपन्या (आर एन बी सीज)

प्रिय महोदय,

**<u>ठेवी किंवा जनतेच्या ठेवींची मुदतपूर्व परतफेड</u>**

उपरोक्त विषयावरील दिनांक ऑक्टोबर ५, २००४ चे परिपत्रक डी एन बी एस (पी डी) सी. सी. सं. ४४/०२.०१/२००४-०५ चे अवलोकन करावे. या परिपत्रकाच्या पॅरा ३(५) प्रमाणे सगळ्या ठेविंचे एकमात्र / पहिल्या ठेवीदारांच्या नावे एकत्र करुन समयपूर्व परतफेडी साठी त्याची एक ठेव मानावी.

२. आम्ही असे स्पष्ट करतो की ठेवींना एकत्र करण्याचे उपरोक्त कलम हे वादग्रस्त गैर बँकींग वित्तीय कंपन्या / प्रकीर्ण गैर बँकींग कंपन्या / अवशिष्ट गैर बँकींग कंपन्यांनाच लागू आहे. आणि हे स्पष्ट करण्यासाठी ते कलम दुरुस्त केले आहे. हे दुरुस्त करणारी अधिसूचना सं.

अ) डी एफ सी. ११८/ डी जी (एस पी टी) – ९८ दिनांक जानेवारी ३१, १९९८

ब) डी एफ सी. ५५/ डी जी (ओ) – ८७ दिनांक मे १५, १९८७ आणि

क) डी एन डी सी. ३९/ डी जी (एच) – ७७ दिनांक जून २०, १९७७

ह्या आजपर्यंत सुधारित अशा अवस्थेत आपल्या माहिती आणि काटेखोर पालनासाठी जोडलेल्या आहेत.

३. अशा रीतीने, एकाच क्षमतेतील एकमात्र / प्रथम ठेवीदाराच्या सर्व ठेवी रु. १०,००० पर्यंत मुदतपूर्व परतफेडी साठी / कर्ज मंजूरीसाठी एकत्रित करण्या संबंधीचे कलम फक्त वादग्रस्त गैर बँकींग वित्तीय कंपन्या / प्रकीर्ण गैर बँकींग कंपन्या / अवशिष्ट गैर बँकींग कंपन्यांनाच लागू होते.

४. आम्ही पुनश्च सांगतो की ठेवीदाराच्या मृत्युनंतर वादग्रस्त गैर बँकींग कंपन्या / प्रकीर्ण गैरबँकींग कंपन्या / अवशिष्ट गैर बँकींग कंपन्या सुधा ठेवीदाराच्या ठेवी / जनतेच्या ठेवी त्यांच्या निश्चित अवरुद्धता अवधि मध्येही त्यांना एकत्रित न करता परतफेड करु शकतात.

५. कृपया रिझर्व बँकेच्या गैरबँकींग पर्यवेक्षण विभागाच्या ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या कक्षेत तुमच्या बँकेचे पंजीकृत कार्यालय येते त्या कार्यालयास पोच द्यावी.

आपला विश्वासू

(पी. कृष्णमूर्ती)
प्रभारी मुख्यमहाव्यवस्थापक